FMT-01

# Bachelor's Degree Programme
# (BDP)

# Assignments
## (For July, 2010 and January, 2011 sessions)

## FOUNDATION COURSE IN MARATHI-01

**School of Humanities**
Indira Gandhi National Open University
Maidan Garhi, New Delhi – 110 068

# मराठी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम

Programme : BDP
Course : FMT-1
Marks : 100
FMT/TMA

## स्वाध्याय क्रमांक - 1

पाठ्यक्रम कोड : एफ एम टी

**प्रश्न. 1) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा. 05**

1. अर्धस्वर कशाला म्हणतात?
2. मूलभूत भाषिक कौशल्ये कोणती आहेत?
3. ललितनिबंध कोणता साहित्यप्रकार आहे?
4. स्वातंत्र्योत्तर काळात वैज्ञानिक संशोधनाने भारताची शान वाढवणारे एक श्रेष्ठ संशोधक कोण आहेत?
5. मराठीतले नातेवाचक शब्द कोणत्या भाषातून आले आहेत?

**प्रश्न. 2) रिकाम्या जागा भरा. 05**

1. ज्यांच्या आधाराने शब्द उच्चारता येतात अशा ध्वनींनाच ........ किंवा 'वर्ण' म्हणतात.
2. कथाप्रियता हा मानवी मनाचा ........ धर्म आहे.
3. '............' हे तत्त्व हा लोकशाहीचा आत्मा आहे.
4. कार्यालयीन टिप्पणीचे मुख्य प्रकार ........ आहेत.
5. वाक्प्रचाराच्या पुढचे पाऊल म्हणजे ........ होय.

**प्रश्न. 3) कंसात दिलेल्या सूचनेप्रमाणे करा. 07**

1. आग्रह, यश (या शब्दापासून विशेषण बनवा.)
2. मी, सगळा (या शब्दांची षष्ठी विभक्तीचे एकवचनी रूपे लिहा)
3. जोर, सकाळ (या शब्दांपासून क्रियाविशेषण अव्यय बनवा)
4. गाढवांचा गोंधळ नि ...... (म्हणीचा उत्तरार्ध पूर्ण करा)
5. मनुश्य समुहजिवन यशस्वी होण्यासाठी कांही नीयम पाळतो. (वाक्य शुद्धलेखनाच्या चुका दुरुस्त करून लिहा.)
6. चातुर्मास, अशक्य (या शब्दाचा समास ओळखून विग्रह करा)
7. तुम्ही इथे कसे हे मला समजत नाही. (या वाक्याचे प्रश्नार्थक वाक्यात रूपांतर करा)

**प्रश्न. 4) खालील विषयावर जाहिरात लेखन करा. 06**

1. हातातील घडी
2. कपड्याचा साबण
3. संगणक

प्रश्न.5) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 300 शब्दात लिहा. 30

1. भारतात कोण-कोणत्या कारणामुळे स्त्री-मुक्ती चळवळीची गरज आहे ? सविस्तर विवेचन करा.
2. 'नव्या मनूतील गिरिधर पुतळा' कवितेत मर्ढेकरांनी भट्टीत कोळसा फेकणाऱ्या काळ्या कोळसेवाल्यांचे वर्णन कसे केले आहे ?
3. प्रल्हादला चौखम्यांचे पाणी पिताना आलेल्या अनुभवाने सामाजिक परिस्थितीचा अर्थ कसा स्पष्ट झालेला आहे ?

प्रश्न.6) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 150 शब्दात लिहा. 18

1. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे या दृष्टिने कोणते कार्य केले ?
2. 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' या कल्पनेचा विस्तार करा.
3. संत आणि सृष्टी यांच्यामध्ये कोणते नाते असते ?

प्रश्न.7) टिपणे करा (कोणतेही पाच) 20

1. एकविसाव्या शतकातील पर्यावरणाचे प्रश्न
2. 'वकील' कथेतील सौंदर्य निवेदन शैली
3. सामाजिक लोकशाही
4. मुगलीमायचे व्यक्तिचित्र
5. संहारक्षम अण्वस्त्रे व मानवी जीवन
6. ललित कला व मनोधर्म

प्रश्न.8) तुमचा भाऊ/बहीण एच.एस.सी परीक्षेत बोर्डातून सर्वप्रथम आला/आली आहे. अभिनंदन करणारे पत्र लिहा. 05

प्रश्न.9) खालील उताऱ्याचे सारांश लेखन करा. 04

खरी सुधारणा कशात आहे हे फार्स्च काळजीने ठरविले पाहिजे. कारण वारंवार होते काय की विशिष्ट वासनाधीश किंवा सत्ताधीन झालेल्या मनुष्यास वास्तविक सुधारणा कशात आहे हे नीट न समजून, जेवढे जुने असेल तेवढे फेकून देण्यात व कसल्या तरी नवीन गोष्टींचा अंगीकार करण्यात आपण सुधारणा करीत आहो असा भ्रम होतो ! असल्या लोकांस सुधारक म्हणण्यापेक्षा दुर्धारक म्हणणे हेच बरे ! उदाहरणार्थ, हिंदु धर्मात बरीच व्यंगे आहेत म्हणून यहुदी, महंमदी, खिस्ती किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या एखाद्या धर्माचा अंगीकार करणाऱ्या

मनुष्यास विचारी ही संज्ञा सहसा देता येणार नाही... ज्या देशात आपले शेकडो पूर्वज जन्मास आले, वाढले व मरण पावले, ज्या देशातील हजारो पिढ्यांनी अनेक गोष्टींत मोठ्या कष्टाने केलेल्या अनेक सुधारणांचे फळ आपणास ऐतेच प्राप्त झाले - अशा देशातील धर्माचा व रीतिरिवाजांचा, व लोकांचा सर्वथैव त्याग करणाऱ्या मनुष्यास खऱ्या सुधारकांची पदवी कधीही शोभणार नाही. स्वभूमीत, स्वलोकांत, स्वधर्मात आणि स्वाचारांत राहून अविचारी व अज्ञान देशबांधवांच्या निंदेस किंवा छळास न भिता, त्यांच्याशी कधी भांडून, कधी युक्तिवाद करून, कधी गोडीगोडी लावून, अथवा सामर्थ्य असल्यास कधी त्यांना दटावून त्यांची सुधारणा करणे यांतच खरी देशप्रीती, खरी बंधुता, खरा देशाभिमान, खरे शहाणपण व खरा पुरुषार्थ आहे, याच्या उलट जे वर्तन करतात ते सुधारणा करीत नाहीत, तर फक्त शृंखलांतर करतात.

**Date of submission of Assignment is**

For June Exam. – **31st March, 2011**

For December Exam. – **30 September, 2011**

**SOH/IGNOU/P.O.5H/May, 2010**

**Printed at : Sita Fine Arts Pvt. Ltd., New Delhi-28**